MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Vidyawarta UGC Jr.No.62759 UGC Approved Refereed Journal

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता ®

रविवार, दि.२५ फेब्रुवारी २०१८

भारतीय विद्यामंदिर, अमरावतीद्वारा संचलित

**भारतीय महाविद्यालय, मोर्शी, जि.अमरावती**

(संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्न)

**व**

**आधार सोशल रिसर्च अॅण्ड डेव्हलपमेंट ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, अमरावती**

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## राष्ट्रीय चर्चासत्र

## "मराठी साहित्य : चर्चा आणि चिंतन"

**प्राचार्य**
जी.एस.मेश्राम
भारतीय महाविद्यालय,मोर्शी
ता.मोर्शी जि.अमरावती

**मुख्य संपादक**
प्रा.विराग गावंडे
संचालक
आधार सोशल रिसर्च अॅण्ड डेव्हलपमेंट
ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, अमरावती

**संपादक**
प्रा.डॉ.भगवान जे.साबळे
मराठी विभाग प्रमुख,
भारतीय महाविद्यालय,
मोर्शी, जि.अमरावती

आयोजक

**मराठी विभाग**

भारतीय महाविद्यालय, मोर्शी,जि.अमरावती

आणि

आधार सोशल रिसर्च अॅण्ड डेव्हलपमेंट ट्रेनिंग इनस्टिट्यूट, अमरावती

13) पालीवंस साहित्यातील महावंसाचे सांस्कृतिक अध्ययन
प्रा. संदीप रा. भालेराव, नागपूर || 53

14) संत तुकाराम आणि त्यांची अभंग गाथा — एक अभ्यास
डॉ. एम. पी. खेडेकर, जि.वाशिम || 55

15) ग्रामीण कविता : कवी ना. घ. देशपांडे
प्रा. अनुप नांदगावकर, जि. वाशिम || 59

16) आदिवासी साहित्यात बाबाराव मडावी यांचे योगदान
प्रा. नितीन जगदिश टेकाम, पांढरकवडा || 61

17) आदिवासी कवितेतील स्त्रीदर्शन
डॉ. प्रवीण व. काळे, जि.वर्धा || 65

18) बहीणाबाईच्या कवितेतील जीवनाविषयक तत्वज्ञान
प्रा. सारिका दादाराव पाचराउत, पातूर || 66

19) कुटुंबकवी: संत चोखामेळा
प्रा. प्रवीण घारपुरे, जि. नागपूर || 69

20) पाली साहित्यातील थेरीगाथामधील स्त्रीजीवन- एक अध्ययन
प्रा. कविता एन. खरात, नागपूर || 74

21) तुकाराम एक भावकवी
सहा.प्रा.शशिकांत वि. काळे, जि. अमरावती || 76

22) महानुभावीय साहित्य
प्रा. हर्षा पं.येवले, जि.बुलडाणा || 79

23) ग्रामीण कादंबरीतील समाजदर्शन
डॉ. सुभाष ज्ञानबा गव्हाणे, चिखली || 82

24) लीळाचरित्र : हिराईसा पिढीपाठोत्तर प्रक्रियेचा शोध
डॉ. केशव गाडबैल, अमरावती || 85

25) साहित्यातील मानवतावादी दृष्टिकोन
प्रा. डॉ. विजय रूपराव राऊत, जि.नागपूर || 87

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

माय बाजारात जाते.
नाही पायात वाहन
रस्ता चालायचा आहे
सारे आयुष्य गहाण.

कष्ट करता करता या आदिवासी मायची कंबर वाकून गेली आहे. तिच्या 'अर्ध पाठीत मोडलं ' आणि असा दुःखद शेवट तिच्या वाट्याला आला आहे. आदिवासी मायचे जीवन काही शिकवणारे पण विशेषतः काही दुःखविणारे आहे. ही माय निरपेक्ष आहे. वाट्याला आलेले सगळे दुःख भोगूनही ती आनंदी व समाधानी आहे.

पान गळीसारखी तिच्या स्वप्नांची गळती तिच्या गोंदलेल्या जीवन वृक्षावरून बारमाही सुरु असते. रुढी परंपरांनी व अंधश्रध्दांची वाळवी तिच्या मानसिकतेला रोज चाटत असते. तरीही ही माय संस्कारकक्षेतच गरगरत राहते.

माझ्या मायेच्या मनात
चंद्रसूर्यांचे सपन
चंद्रावानी थंडगार
सूर्यासम तळपणार

काही उपमा अलंकारांचाही आढळ या कवितेत होतो. कवींच्या कवितेतील आदिवासी माय समजून घेतली. तिचे रुग, रुप, दुःख-कष्ट तिच्या भावभावना, अशा-आकांक्षा त्यांच्या कवितेतून प्रगट होतांना दिसते. रानात पोटासाठी तिची वणवण व भटकंती आजही सुरू आहे.

□□□

18

# बहीणाबाईच्या कवितेतील जीवनाविषयक तत्वज्ञान

प्रा. सारिका दादाराव पाचराउत
डॉ. एच. एन.सिन्हा महाविदयालय, पातूर मराठी विभाग

**********

हिंदी साहित्यकोशामध्ये साहित् + यत = शब्द और अर्थ का यथावत सहभाव याने सार्थक शब्द का नाम साहित्य अशी साहित्य या शब्दाची व्याख्या केली आहे. तर ज्या साहित्यामध्ये समाजाबद्दलच्या हितबुद्ध्दीचा भाव उमटलेला आहे त्याला संत ज्ञानेश्वरांनी साहित्य असे म्हटलेले आहे ! बहिणाबाईंची कविता ही एका निरक्षर स्त्रीची कविता असली तरी ती मराठी साहित्यात अक्षर वाङःमयाशी जवळीक साधणारी कविता ठरली आहे. कारण त्यांच्या कवितेत स्वानुभाव, आणि समाजाचे हित साधाणारे जीवनविषयक तत्वज्ञान दडलेले आहे. त्यांच्या कवितेत स्त्रीजीवनाच तत्वज्ञान आहे, मानवी जीवनाच तत्वज्ञान आहे, आध्यात्मिक तत्वज्ञान आहे. जीवनाला तत्वज्ञानाचा आशय प्राप्त करुन देण्याची दृष्टी बहिणाबाईंमध्ये होती. त्यातून जीवनाच्या बऱ्या वाईटाकडे पाहण्याचे असाधारणत्व बहिणाबाईंच्या कवितेतून जाणवते.

'हीरीताच देणं घेणं' या त्यांच्या कवितेत त्या म्हणतात
हिरीताचं देणं घेणे
नही पोटासाठी
नको लागू जीवा सदा
मतलबासाठी !
पाहीसनी रे लोकाचे
यवहार खोटे नाटे
तव्हा बोरी बाभळीच्या
अंगावर आले काटे
राखोयीच्यासाठी झाल्या
शेताले कुपाटी
नको लागू जीवा सदा मतलबसाठी !!

लोकांचे बरे वाईट व्यवहार बघून बोरी बाभळींनाही काटे आले याही पुढे जाऊन राखोयांच्यासाठी झाल्या शेताले कुपाटी (कुपाटी = कुंपन) गुरा ढोरांनी शेतातील पिक खाऊ नये म्हणून शेताला कुंपन

करतात ही वास्तविकता घेऊन बहीणाबाई जीवनाच तत्वज्ञान व्यक्त करतात. शेत खाल्ल जाऊ नये म्हणून शेताला कुंपन करतात ही वास्तविकता घेउन बहिणाबाई जीवनाच तत्वज्ञान व्यक्त करतात. शेत खाल्ल जाऊ नये म्हणुन शेताच्या माये पोटी आपणच स्वतः आपल्याला कुंपन बनुण रक्षण करणाऱ्या बोरी बाभळी खूप काही सांगून जातात.

बहिणाबाईंची स्त्री जीवनाच तत्वज्ञान सांगणारी एक अत्यंत हृदयस्पर्शी कविता आहे. योगी आणि सासुरवाशीण या कवितेतून बहिणाबाईला स्त्री जीवनाचे पायाभूत तत्वज्ञान चांगल्या रितीने कळले होते असे वाटते. त्या म्हणतात.

देरे देरे योग्या ध्यान
ऐक काय मी सांगते !
लेकीच्या माहेरासाठी
माय सासरी नांदते !!
देव कुठे देव कुठे
भरीसनी जो उरला !
अरे उरीसनी माझ्या
माहेरात सामावला !!

कुणासाठी जगण्यात स्त्रीला खरा आनंद आहे ? या प्रश्नाच उत्तर बहिणाबाईंनी दिलेले आहे. लेकीच्या माहेरासाठी माय सासरी नांदते ! स्त्रीला माहेराची भेट म्हणजे देवाची भेट वाटते. कारण दुःखाच्या प्रसंगी सावली धरणार माहेर असते म्हणून माहेराच्या भेटीत बहिणाबाईंना देवाच्या भेटीचा आनंद वाटतो.

जीवन आणि मरणाच्या मधल अंतर त्या आपल्या माझ्या जीवा या कवितेतून मांडतात.

नही सरलं सरलं, जीवा तुझं येणं जाणं
जसा घडला मुक्काम, त्याले म्हणती रे जीनं
आला सास, गेला सास, जीवा तुझं रे तंतर
अरे जगणं मणं एका सासाचं अंतर !

जगण आणि मरण यात फक्त एका श्वासासच अंतर आहे. जीवन किती नश्वर क्षणभंगूर आहे हे जीवनाचे अटळ सत्य, तत्वज्ञान बहिणाबाईंनी किती सपर्पक पणे आपल्या कवितेतून मांडल आहे. सुख आणि दुःख जीवनात ऊन सावली सारखे आहे. त्यामुळे त्यावर मात करुन हे माझ्या जीवा तू हसत हसत जग म्हणजे तुझ हे धारिष्ट्य पाहून संकट आपोआप पळून जातील. त्या पुढील ओळीतून जगन कस तोळाचं असाव ते सांगतात.

जग जग माझ्या जीवा
अस जगनं तोलाच !
उच्च गगना सारख
धरत्रीच्या रे मोलाच !!

हया बहिणाबाईंच्या ओळी आत्मसन्मानान, तोलाचं जगण्याच बळ देतात. यातून बहिणाबाईसारख्या एकाकी जीवन जगणाऱ्या स्त्रीच मानसिक सामर्थ्य, मनाचा कणखरपणा आपल्या सारख्या जिवनातील साध्या साध्या प्रसंगामुळे नैराश्य येणाऱ्यांना प्रेरणा देऊन जातो. आभाळासारखे उंच आणि धरीत्री सारखे मोलाचे जीवन जगण्याचा सल्ला बहिणाबाई देतात.

मन ही बहिणाबाईंची अतिसुंदर अशी कविता. त्यातील शब्द प्रतिमा बघून बहिणाबाईंची प्रतिभा, किती प्रगलभ होती याची जाणीव होते. बहिणाबाईने माणसाच्या मनाला दिलेली उपमा समर्पक आहे. ओढाळ ढोर उभ्या भर पिकावर जाण्यासाठी लालचावले की त्याला कितीही हाकलले तरी ते परत तिथेच येते. मनाचेही तसेच मन पाखरासारखे क्षणात इथे भुईवर तर क्षणात आभाळात ! कधी खाकसाच्या दाण्यासारखे लहान तरी कधी आभाळाहूनही मोठे.

मन एवढ एवढ जसा खाकसाचा दाणा
मन केवढ केवढ आभायात बी मायेना !

एवढी मनाची व्याख्या फ्राईडने देखील केली नसेल. बहिणाबाई मानसशास्त्राच्या अभ्यासक वाटतात. पुढे त्या देवाला म्हणतात.

देवा अस कस मन । आस कस र घडल
कुठे जागेपणी तुला । आस सपन पडलं

मानवी मन म्हणजे तुला जागेपणी पडलेलं स्वप्न आहे !

'लपे करमाची रेखा या कवितेत बहिणाबाई दैववादापेक्षा कर्मवादावला प्राधान्य देतांना दिसतात. स्त्रीच्या जीवनात तिचा पती गेल्यानंतर तीच सार जीवनच बदलून जाते. आणि पुढचं भविष्य सांगण्यासाठी कोण्या ज्योतीषाची गरज नसते. देवाला मागणे एकच 'ठेव दोन लाल सुखी ' हेच पंचांग वगैरे पाहण्याची काही गरज नाही. कारण कर्ता पुरुष गेल्यावर ती जागा मला घ्यावी लागणार हे कुणी सांगायची गरजच नाही. जबाबदारी पडली म्हणजे ती आपोआपच माणसाला/ बाईला पावरफुल बनवते म्हणूनच त्या म्हणतात.

नको नको रे जोतीषा
नको हात माझा पाहू
माझ दैव माले कये
माहया दारी नको येऊ

स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास असणाऱ्या बहिणाई येणाऱ्या जबाबदाऱ्यांना ओझ न समजता कर्तूत्व समजतात व तितक्याच दमाने पावरफुल होऊन कणखर होऊन आपल्या समोर उभ्या राहतात.